आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१० डिसेंबर २०२४ - मंगळवार

ठळक बातम्या

- गरिबी आणि भूक निर्मूलन करणारी, तरुणांना समान संधी देणारी धोरणं राबवून भारतानं जगासमोर वस्तुपाठ ठेवला असल्याचं राष्ट्रपतींचं प्रतिपादन

- संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये आजही विविध कारणांवरून गदारोळ, कामकाज दिवसभरासाठी तहकूब /राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनखड यांच्याविरुद्ध इंडिया आघाडीचा अविश्वास प्रस्ताव

- सातव्या स्मार्ट इंडिया हॅकेथॉनची अंतिम फेरी उद्या देशभरातल्या ५१ केंद्रांवर एकाच वेळी सुरु होणार, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी विद्यार्थ्यांशी साधणार संवाद

- माजी परराष्ट्र मंत्री आणि महाराष्ट्राचे माजी राज्यपाल एस. एम. कृष्णा यांचं निधन

- मुंबईत बेस्ट बस अपघातातल्या मृतांची संख्या ७ वर, मृतांच्या कुटुंबांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत जाहीर

<><><><><><>

देशात गरिबी आणि भूक निर्मूलन करणारी तसंच तरुणांना समान संधी देणारी धोरणं राबवून भारतानं जगाला वस्तुपाठ घालून दिला आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. त्या आज नवी दिल्लीत विज्ञान भवन इथं आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. देशातल्या सर्व नागरिकांचे हक्क आणि प्रतिष्ठा जपण्याच्या दृष्टीनं देशात समान डिजिटल वातावरण तयार होण्याची गरज त्यांनी यावेळी अधोरेखित केली.

मानवी हक्क दिनानिमित्त आकाशवाणीला दिलेल्या मुलाखतीत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यकारी अध्यक्ष न्यायमूर्ती बी. आर. गवई यांनी सांगितलं, की देशात या वर्षी राष्ट्रीय लोक अदालतींमध्ये सात कोटी सत्तर लाख प्रकरणं निकाली काढली गेली.

<><><><><><>

प्रत्येक व्यक्तीच्या हक्कांचं रक्षण झालं तरच आपली लोकशाही बळकट होते, असं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे. आंतरराष्ट्रीय मानव हक्क दिनानिमित्त राज भवनातल्या दरबार हॉल इथं महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगानं आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

मुंबई उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती नरेश पाटील या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

<><><><><><>

संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये आजही विविध कारणांवरून गदारोळ होऊन आधी दुपारी बारा वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी कामकाज तहकूब करण्यात आलं. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी विरोधकांच्या वागणुकीबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली. सभागृहाच्या सभ्यतेचे पालन केलं जावं, तसंच देशातल्या जनतेच्या आशाआकांक्षांचा आदर राखत काम केलं जावं, असं आवाहन त्यांनी विरोधी नेत्यांना केलं.

राज्यसभेतही असंच चित्र दिसून आलं. आम आदमी पार्टीचे खासदार संजय सिंग यांनी दिल्लीतल्या कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित केला. यावर सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात खडाजंगी झाल्यानं अध्यक्ष जगदीप धनखड यांनी कामकाज तहकूब केल्याचं जाहीर केलं.

<><><><><>

राज्यसभेत अध्यक्ष जगदीप धनखड यांच्याविरुद्ध काँग्रेसप्रणित इंडिया आघाडीनं अविश्वास ठराव मांडला आहे. विरोधी पक्षांच्या सदस्यांना सभागृहात बोलण्याची संधी नाकारुन पक्षपात करत असल्याचा आरोप करत विरोधकांनी हा प्रस्ताव मांडला असल्याचं काँग्रेस नेते जयराम रमेश यांनी ट्विटरवर म्हटलं आहे. लोकशाहीच्या रक्षणार्थ नाईलाजाने विरोधी आघाडीला हा निर्णय घ्यावा लागल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

सातव्या स्मार्ट इंडिया  हॅकेथॉनची अंतिम फेरी उद्या देशभरातल्या ५१ केंद्रांवर होणार असून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान त्याचं उदघाटन करतील. यात महाराष्ट्राल्या मुंबई, पुणे, नागपूर आणि कोल्हापूर या केंद्रांचाही समावेश आहे. राज्यात सुमारे तेराशे विद्यार्थी यात सहभागी होणार आहेत. यात महाराष्ट्रातल्या मुंबई, पालघर, बुलडाणा, नांदेड, कोल्हापूर, नाशिक धुळे, पुणे, नागपूर, वर्धा, सोलापूर, ठाणे, सांगली आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यातल्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. मुंबईत ही स्पर्धात एल एन वेलिंगकर संस्थेत होणार आहे.

यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या या विद्यार्थ्यांशी संवाद साधणार असून त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. यंदाच्या हॅकेथॉनमध्ये संस्था स्तरावर दीडशे टक्के वाढ नोंदवली गेली आहे.

<><><><><>

माजी परराष्ट्र मंत्री आणि महाराष्ट्राचे माजी राज्यपाल एस. एम. कृष्णा यांचं आज पहाटे बंगळुरू इथे त्यांच्या निवासस्थानी निधन झालं. ते ९२ वर्षांचे होते. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना काही दिवसांपूर्वी रुग्णालयात दाखल केलं होतं. रुग्णालयातून घरी आल्यानंतर पुन्हा त्यांची प्रकृती खालावली आणि आज पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली. एस. एम. कृष्णा यांनी आपल्या दीर्घ राजकीय कारकिर्दीत अनेक महत्त्वाची पदं भूषवली. १९९९ ते २००४ या काळात ते कर्नाटकचे मुख्यमंत्री होते. तर केंद्रात २००९ ते २०१२ पर्यंत परराष्ट्र मंत्री म्हणून त्यांनी काम केलं होतं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी कृष्णा यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. कृष्णा हे अनुभवी संसदपटू होते. त्यांनी राज्यपाल पदाची प्रतिष्ठा कायम जपली. त्यांच्या निधनामुळे देशानं राजकारणातलं एक सुसंस्कृत आणि अभिरुचीसंपन्न व्यक्तिमत्त्वं गमावलं असल्याची भावना महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आपल्या शोकसंदेशात व्यक्त केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजीत पवार, काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनीही कृष्णा यांच्या निधनाबद्दल दुःख व्यकत केलं आहे.

<><><><><>

मुंबईत कुर्ला इथं बेस्ट बसच्या अपघातातील मृतांची संख्या सातवर पोहचली आहे. तर, जखमींची संख्या ४९ झाली आहे. जखमींना उपचारासाठी मुंबईतील विविध रुग्णालयांमधे दाखल केलं आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. तसंच, मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून पाच लाख रुपये आर्थिक मदत जाहीर केली आहे. अपघातातल्या जखमींच्या उपचाराचा खर्च मुंबई महापालिका आणि बेस्टच्या वतीनं करण्याचे आदेशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

दरम्यान, या बसच्या चालकाला न्यायालयानं २१ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.

<><><><><>

यूपीएससी अर्थात केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा मुख्य परीक्षा २०२४ चा निकाल जाहीर झाला आहे. या परीक्षेत निवड झालेले  उमेदवार आता भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय परदेश सेवा, भारतीय पोलीस सेवा आणि

इतर सेवांमध्ये निवड होण्यासाठी व्यक्तिमत्त्व चाचणी मुलाखतीला सामोरे जातील. या मुलाखतीच्या तारखा नंतर जाहीर करण्यात येतील. हा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

<><><><><><>

आसाम चळवळीत स्वतःच्या प्राणांचे बलिदान देणाऱ्या आणि अतुलनीय शौर्य गाजवणाऱ्या हुतात्म्यांना आज स्वाहिद दिवसाच्या निमित्तानं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आदरांजली वाहिली आहे. त्यांचा दृढ निश्चय आणि निःस्वार्थ प्रयत्नांमुळे आसामच्या संस्कृतीची ओळख जतन करण्यात मदत झाली असून त्यांचे शौर्य प्रत्येकाला विकसित आसामसाठी कार्यरत राहण्यास प्रेरित करते, असंही ते म्हणाले.

<><><><><><>

प्रशासन अधिक पारदर्शी आणि नागरिकाभिमुख व्हावं याकरता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या १० वर्षात विशेष प्रयत्न झाले असं केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंग यांनी म्हटलं आहे. केंद्रीय माहिती आयोगाच्या १६व्या वार्षिक संमोलनात आज ते बोलत होते. गेल्या १० वर्षात माहिती अधिकार अर्जांमधे वाढ झाली असून ती प्रशासनाची पारदर्शकता, तक्रारनिवारणातली तत्परता आणि नागरिकांचा विश्वास दर्शवते असं ते म्हणाले.

<><><><><><>

ओदिशा मास्टर्स २०२४ बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष एकेरी पात्रता फेरीच्या आजच्या पहिल्या सामन्यात भारताच्या मानव चौधरीने संयुक्त अरब अमिरातीच्या मोहम्मद मुन्नवर याच्यावर २१-१६, २१-१२ असा विजय मिळवला. दुसरीकडे भारताच्या राजेश श्रीकर याला चीनच्या लिऊ यू झुआन याच्याकडून ११-२१, २१-२३ असा आणि गगन बलयानला वांग झी जून याच्याकडून १२-२१, ११-२१ असा पराभव पत्करावा लागला. तसंच भारताच्या अभिनव ठाकूरने भारताच्याच केविन थंगम केविन याचा, प्रणय शेट्टीगरने नरेन शंकर अय्यर याचा तर गोविंद कृष्णा याने निकोलस राज याचा पराभव केला.

मिश्र दुहेरीत भारताच्या अमन मोहम्मद आणि सिमर सिंघी या जोडीनं हरी भारती भास्करन आणि नरधन रवीशंकर या जोडीला पिछाडीवर टाकलं आहे.

<><><><><><>

वर्ष २०२५ पासून सामायिक विद्यापीठ प्रवेश परीक्षा, फक्त सी बी टी अर्थात संगणक आधारित चाचणी स्वरूपात घेण्यात येईल, अशी माहिती विद्यापीठ आयोगाचे अध्यक्ष एम . जगदीश कुमार यांनी आज बातमीदारांना दिली. विदयार्थ्यांनी १२ वीच्या परीक्षेसाठी निवडलेले विषयच या परीक्षेत घेण्याचं बंधन असणार नाही. या परीक्षेचा कालावधी एक तासाचा राहील आणि सर्व प्रश्न अनिवार्य असतील. पूर्वीसारखे पर्यायी प्रश्न दिले जाणार नाहीत.या अगोदर ३७ विषयांच्या परीक्षा घेतल्या जात होत्या. आता ६३ विषयांच्या परीक्षा घेतल्या जातील. विद्यार्थ्यांना जास्तीतजास्त ५ विषयांची निवड करता येईल. पूर्वी विद्यार्थ्यांना ६ विषयांची निवड करता येत असे. आयोगानं स्थापन केलेल्या तज्ज्ञांच्या समितीनं या परीक्षेचा आढावा घेऊन वरील बदल सुचवले आहेत.

//<><><><><><>//